भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४८८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०७/२०१७

१)बिना पास परवाना रेतीची चोरटी वाहतुक करतांनी ,व शासकीय कामात अडथळा निर्मान केल्याने गुन्हा नोंद .:–

दिनांक ०२/०७/२०१७ चे २२.३० वा. दर. यातील फिर्यादी सुर्यकांत दत्तात्रय पाटील वय ३७ वर्ष रा. तहसीलदार मोहाडी लोकसेवक हे त्यांचे पथकासह शासकीय वाहनावने बिना परवाना वाहतुक करणाऱ्या वाहनावर कारवाही बाबत पेट्रोलींग करीत असतांनी यातील आरोपी ट्रक चालकांनी संगनमत करून बिना परवाना चोरीच्या टक मध्ये ५ ब्रास रेती दंडासह किमती ५२,०००/रु चा माल मिळुन आल्याने कार्यवाही करीत असतांनी टाटा इंडीका क्र. एमएच ३६ एच २६४२ मध्ये दोन इसम येथे येवुन तोंडा–तोंडी फिर्यादीसोबत हुज्जतबाजी करून शासकीय कामात अडथळा निर्माण करून रेतीने भरलेला ट्रक,ट्रक चालकाने पळवुन नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,३५३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी राऊत पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

२) मोटार सायकलच्या धडकेत एक गंभिर जखमी व एकाचा मृत्यु .:–

दिनांक २६/०६/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालुवन विरूध्द दिशेने येणाऱ्या मोटार सायकल क्र. एमएच ३५ यु ६१४४ चा चालक शुभम अशोक लाहोरकर वय १९ वर्ष रा. सिहोरा याच्या मोटार सायकलला धडक मारून गंभिर जखमी करण्यास व मागे बसलेला रितेश जितेंद्र घोडीचोर वय १६ वर्ष रा. सिहोरा यांचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३३८,३०४ (अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कदम पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

३) निष्काळजीपने मोटार सायकल चालवुन एकाचा मृत्यु व एक जखमी . :–

दिनांक ०३/०७/२०१७ चे १७. वा. दर. यातील आरोपी चालकोने त्याचे ताब्यातील बिना नंबरची मोटार सायकल वर डबल सिट बसवुन कारधा कडुन भंडारा कडे जुन्या हायवे रोडने येत असता भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालुवन त्याचे समोरून जाणाऱ्या मेटॅडोअरला ओव्हरटेक करून समोरून येणाऱ्या स्पेल्डर मोटार सायकल क्र. एमएच ३१ डिन ००९६ ला धडक मारून मोटार सायकल चालक मेघशाम बाबुराव तलमले वय ६२ वर्ष रा. तुमसर याचे मरणास व राजु नागपुरे यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे पोहवा गायधने यांचे चौकशी अहवाल व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८, ३०४ (अ) भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

३) शुल्लक कारणावरून लाखडी स्टुलने कपाळावर मारून व भांडण करून शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद.–

दिनांक ०३/०७/२०१७ चे ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी राजेश शिवचरण डुंभरे वय ३५ वर्ष, रा. जेवनाळा हा पानठेल्यावरील बेंचवर पेपरटाकुन बसला असता यातील आरोपीने 'पेपर टाकुन का बसला तेथुन ऊठ' असे बोलुन भांडण शिवीगाळ करून फिर्यादीचे कपाळावर लाखडी स्टुलने मारून जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**४) पैशाच्या कारनावरून संगनमत करून कुऱ्हाडीच्या दांडयाने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद–.**

दिनांक ०३/०७/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील आरोपीच्या भावाने फिर्यादीचे वडील कडे ८,०००/रु. ठेवण्यास दिले होते ते पैसे फिर्यादीस मागीतले असता, 'तुम्ही दिलेले पैसे वडीला कडुन घ्या' असे म्हटल्यावर आरोपीतांनी संगनमत, भांडण करून आरोपी क्र. १ ने हातात असलेल्या कुऱ्हाडीच्या दांडयाने फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**५) सायकलने धडक मारून शिवीगाळ करून विटाने डोक्याला मारून गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०२/०७/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील जख्मी फिर्यादी सुभाष सखराम उईके वय ३५ वर्ष रा. चांदोरी हा त्याचे घरून तंबाखुची पुडी घेवुन रस्त्याने पाई जात असतांना आरोपी हा सायकलने समोरून येवुन जख्मी फिर्यादी जवळुन सायकल नेल्याने जखमीस धडक लागली असता जखमीने धडक का मारलास असे बोलला असता आरोपीने भांडण शिवीगाळ करून विटाने डोक्यावर डावे बाजुस मारून जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**६) दारूच्या नशेत गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ०३/०७/२०१७ चे १५.०० वा. पुर्वी. यातील मृतक प्रकाश जयराम साखरे वय ३२ रा. न्यु फ्रेन्डस कॉलोनी भंडारा येथे पत्नीसह राहत होता, त्याची पत्नी घरी हजर असतांनी तो दारू पिवुन आला व पत्नीला बेडरूमध्ये झोपतो असे म्हणुन रूम मध्ये गेला व बेडरूममधील सिलींगफॅन ला फुलपॅन्टने बांधुन गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी सौ. शिल्पा प्रकाश साखरे वय २४ वर्ष, रा. न्यु फ्रेन्डस कॉलोनी भंडारायांचे लेखी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ प्रमाने मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ.घरडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) अवैध दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक ०३/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा ,कारधा,साकोली येथे अवैध दारु अंडयावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३५ लिटर हातभट्टी दारु किंमती ७,५००/–रु. व ४ लिटर ६८० एमएल देशी दारू कि. १३००/रु. तसेच जुगारातुन कि. १२१२/–रु. असा एकुन कि.१०,०१२/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०३/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३ ,तीन सिटर वाहनांवरती २१ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एम.एम. सिडाम)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारापोलिस संकेतस्थळावर ठेवण्याकरिता.